http://www.e-mahanagar.com
आपलं महानगर
बुधवार २३ जून २०१० | मुंबई | रुपये २ | वर्ष २१ | अंक १५१ | पानं १० RNI-49802/90 Reg.No.MH/MR/WEST/210/2009-2011

# एक वेगळी बाजू...




*प्रसाद ग्रुपचे डायरेक्टर साई प्रसाद, अभिनेता जितेंद्र,प्रसाद ग्रुपचे अध्यक्ष प्रमेश प्रसाद : थ्री डी स्टूडिओच्या अनावरणप्रसंगी*

पार्टी
PARTY
दिलीप ठाकुर

तंत्र आणि तंत्रज्ञ ही 'चित्रपट माध्यमा'ची अत्यंत महत्त्वाची बाजू. पण दुर्दैवाने ती केवढी तरी दुर्लक्षित राहिली आहे. संकलनापासून कला दिग्दर्शनापर्यंत अनेक प्रकारच्या आव्हानात्मक कारागिरीची प्रसार माध्यमातून फारशी दखल घेतली जात नाही. त्यामुळे 'सिनेमाचा विषय' म्हणजे खाली जुन्या आठवणी, फुकटचे सल्ले आणि गॉसिपिंग असे दुर्दैवाने समीकरण झाले.

या आठवड्यात सुदैवाने एक नव्हे तर दोन तांत्रिक बाजू समजावून घेण्याचे योग आले. (नेहमीच्या चकचकाट-झगमगाट-दिखावूपणापेक्षा ते खूप वेगळे असल्याने त्याची चव खूप वेगळी ठरली.)

एल.व्ही. प्रसाद या एकेकाळी ख्यातनाम असलेल्या निर्मात्यांचा मुलगा रमेश याने आपल्या देशात आणलेल्या 'थ्री डी कॅमेऱ्या'ची आम्हा प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना ओळख करून दिली. यावेळी एकेकाळी प्रसाद प्रॉडक्शनच्या 'बिदाई', 'जीने की राह', 'उधार का सिंदूर' 'जय विजय' या चित्रपटातून भूमिका साकारणाऱ्या जितेंद्रने चक्क कॅमेऱ्याबरोबर आपला फोटो काढून घेतला. त्याच्या फिटनेसइतकेच या गुणाचेही कौतुक हवे. रमेश प्रसादना आपल्या हैदराबादच्या 'आयनॉक्स' मल्टिप्लेक्समध्ये जेम्स कॅमेरूनच्या 'अवतार'ला लाभलेल्या यशामुळे आपल्या देशातही अशा चित्रपटासाठी लागणाऱ्या थ्री डी कॅमेऱ्याची गरज असल्याचे पटले. पण तो तेवढ्यावरच थांबला नाही तर त्याने तसा कॅमेरा आणलादेखील. आता त्याचा सदुपयोग करण्याची जबाबदारी इतरांची आहे. आपल्या मनोरंजन उद्योगातील नवीन पिढी 'फिल्मी पसंती'मध्ये अडकण्यापेक्षा काही तरी क्रिएटिव्ह करणारी आहे. त्यामुळे थ्रीडीत काही चांगले 'पाहायला' मिळेल अशी अपेक्षा आहे.

तर दुसरा कार्यक्रम कमालीचा भावपूर्ण होता. फाळके पारितोषिक लाभल्याबद्दल वेस्टर्न इंडिया सिनेमा फोटोग्राफर्स असोसिएशनच्या वतीने छाया दिग्दर्शक व्ही. के. मूर्ती यांच्या सत्काराचे आयोजन केले गेले. एखाद्या तंत्रज्ञाला असा सर्वोत्तम पुरस्कार लाभण्याचा योग हा पहिला. खरं तर चित्रपटात अगोदर तंत्र आणि त्या जोडीने 'स्टार' असा क्रम येतो. पण आपली चित्रपटसृष्टी अगोदर स्टार आणि जमलंच तर मग बाकीच्या गोष्टी अशा पद्धतीने ओळखली जाते, हे गुणी आणि मेहनती तंत्रज्ञांचे मोठेच दुर्दैव आहे. म्हणून तर प्रसार माध्यमे कायम ग्लॅमर आणि गॉसिपिंगमध्ये रमतात. तंत्रज्ञांच्या कारागिरीपेक्षा स्टार्सचे 'चेहरे' सतत नजरेत असतात. व्ही. के. मूर्तींचा सत्कार या साऱ्या वातावरणात खूप खरा आणि वेगळा. चित्रनगरीतील व्हीसलिंग वूडमध्ये त्याचवेळी काही बुजुर्ग कॅमेरामॅनचाही सत्कार झाला. त्यात अनिल मित्रा, पीटर परेरा, एसएल शर्मा, रामआलम मोहन, ईश्वर बिरद्री, प्रविण भट्ट, इत्यादींचा समावेश होता. प्रत्येकाच्या 'कारागिरी'चे तीन मिनिटाच्या चित्रफितीतून दर्शन घडताना कृष्ण धवल काळापर्यंत मागे जाता आले, काही आठवणी आल्या. हिंदी चित्रपटाच्या वैभवशाली वाटचालीत अशा अनेकांचा हातभार आहे हे नवीन पिढीसमोर येत राहणे गरजेचे आहे, हेही प्रकर्षाने जाणवले. व्ही. के. मूर्ती स्वत: हजर राहू शकले नाहीत, पण व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे ते खूप भावपूर्ण बोलले. त्यांच्यावरचा दहा मिनिटांचा माहितीपट खूप बोलका होता. त्यात ते गुरुदत्तबद्दल जिव्हाळ्याने बोलले. 'जाल'मध्ये गुरुदत्तने दिलीपकुमारला संधी द्यायचे ठरवले, पण मूर्तीसह अनेकांना वाटले, स्वत: गुरूदत्तने ती भूमिका करावी, ही आठवण त्यावेळी त्यांनी सांगितली. (मराठीतील चित्रपटविषयक पुस्तकात 'व्यासा'चे या संदर्भात नाव दिले जाते, ती माहिती चुकीची आहे म्हणायचे ना?) अशा वेगळ्या वातावरणाची गोडी जेवणापेक्षाही महत्त्वाची होती.

glam.thakurdilip@gmail.com